# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्र क ट न

**विषय– फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेतील "इंग्रजी" विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील त्रुटीबाबत...**

---

फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा दि. २१ फेब्रुवारी २०२३ पासून आयोजित करण्यात आलेली आहे.

आज दि. २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी **"इंग्रजी"** विषयाची परीक्षा पार पडली. प्रचलित पध्दतीप्रमाणे इंग्रजी विषयाची संयुक्त सभा विषय तज्ज्ञ व सर्व विभागीय मंडळाचे प्रमुख नियामक यांच्या समवेत आयोजित करण्यात आली होती. तथापि शिक्षकांचा त्यांच्या धोरणात्मक मागण्यांबाबत बहिष्कार असल्यामुळे सदरची सभा होवू शकलेली नाही.

**"इंग्रजी"** विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांमध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटीबाबत मुख्य नियामकांची संयुक्त सभा पुनःश्च आयोजित करण्यात येवून **"इंग्रजी"** विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील त्रुटीबाबत संयुक्त सभेचा अहवालानुसार विद्यार्थ्यांना योग्य तो न्याय देण्यात येईल. उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २१.०२.२०२३

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.